# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक क्र. ०७ /२०१९

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने, शासन निर्णय क्रमांक:-शिस्तभंग -२०१५/प्र.क्र.६६४/१५/विशि-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१८ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठांमधील शिक्षकेतर सेवकांच्या पदनामात बदल करुन वेतनश्रेणीत बदल करण्यात आलेल्या पदांच्या वेतनश्रेण्या व पदनामे पूर्ववत करुन अतिप्रदान झालेल्या रकमेची वसूली करण्यासंदर्भात आदेश निर्गमित केले आहेत. सदर शासन निर्णयाव्दारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षकेतर सेवकांच्या पदनाम व वेतनश्रेणी बदलासंदर्भातील महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेले काही शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने रद्द केलेले आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५ (८१) नुसार शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांचे अनुपालन करणे व ते पार पाडणे विद्यापीठावर बंधनकारक असल्यामुळे सदर दिनांक १७ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठास कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

सबब, या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक :-शिस्तभंग-२०१५/प्र.क्र.६६४/१५/विशि-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१८ मधील मुद्दा क्र. ६ मध्ये नमूद केल्यानुसार माहे जानेवारी, २०१९ पासून वेतन अदा करण्यात येईल.

**सोबत :-** महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक :-शिस्तभंग -२०१५/ प्र.क्र.६६४/१५/ विशि-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१८ ची प्रत.

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 130
दिनांक : 09 JAN 2019

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

पदनामात बदल करताना वेतनश्रेणीत बदल झालेल्या पदांच्या वेतनश्रेण्या व पदनामे पूर्ववत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः शिस्तभंग- २०१५/प्र.क्र.६६४/१५/विशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- १७ डिसेंबर २०१८

वाचा :-

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन अधिसूचना क्र.एनजीसी-१२८९/१७१०९/(४४६८)/विशि-४, दिनांक ०४ फेब्रुवारी, १९९९.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन अधिसूचना क्र. संकीर्ण- २००९/(३२६/०९)/विशि-१, दि.०७ ऑक्टोबर, २००९.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २००७/(१२२/०७)/विशि (प्रशा), दि. ०६ जुलै, २००९.
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पीयुपी- २००९/(३४८/०९)/विशि-१, दि. २७ ऑगस्ट, २००९.
५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.बीएमयू- २००९/(३४९/०९)/विशि-१, दि. १७ सप्टेंबर, २००९.
६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एसयुके- २०१०/(४७०/१०)/विशि-१, दि. १३ ऑक्टोबर, २०१०.
७. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एनएमयु- २००९/(५०४/०९)/विशि-१, दि. ०४ डिसेंबर, २००९
८. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एसएयु- २००९/(३७२/०९)/विशि-१, दि. ०५ सप्टरेंबर, २००९.
९. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. जीयुजी- २०११/(१०४/११)/विशि-१, दि.१६ मे, २०११.
१०. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पीयुपी- २०१०/(५९३/१०)/विशि-१, दि. ०२ नोव्हेंबर, २०१०.
११. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पीयुपी- २०११/(६३/११)/विशि-१, दि. १८ फेब्रुवारी, २०११.
१२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पीयुपी- २०१२/(३९४/१२)/विशि-१, दि. ०३ नोव्हेंबर, २०१२.

१३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.बीएमयू- २०११/(१३८/११)/विशि-१, दि. ०७ एप्रिल, २०११.

१४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एसयुके- २०११/(७१/११)/विशि-१, दि. २४ फेब्रुवारी, २०११.

१५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एनएमयु- २०१०/(५६७/१०)/विशि-१, दि. २६ ऑक्टोबर, २०१०.

१६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एसएयु- २०११/(४९३/११)/विशि-१, दि. २२ नोव्हेंबर, २०११.

१७. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. जीयुजी- २०११/(५६४/११)/विशि-१, दि. १५ फेब्रुवारी, २०१२.

प्रस्तावना:-

राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर पदांना पाचव्या वेतन आयोगाची वेतनसंरचना दि.०४ फेब्रुवारी, १९९९ च्या अधिसूचनेन्वये लागू करण्यात आली. त्यामध्ये विद्यापीठ निहाय व पदनिहाय संवर्गाची वेतनश्रेणी दर्शविलेली आहे. तद्नंतर राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर पदांना सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनसंरचना शासन अधिसूचना दि.०७ ऑक्टोबर, २००९ अन्वये मंजूर केलेल्या आहेत. सदरहू अधिसूचनेत पदनिहाय संवर्गाच्या पाचव्या वेतन आयोगाच्या व सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेण्या दर्शविलेल्या आहेत.

शासन निर्णय दि.०६ जुलै, २००९ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठामधील शिक्षकेतर पदाचे अ, ब, क, ड अशा गटनिहाय सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला असून सर्व अकृषि विद्यापीठांना पदनिहाय आकृतिबंधाचे प्रस्ताव सादर करण्याचे सूचित करण्यात आले. त्यानुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठाचे पदानिहाय आकृतीबंध विद्यापीठनिहाय स्वतंत्र शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (पूर्वीचे पुणे विद्यापीठ), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या अकृषि विद्यापीठांनी विद्यापीठातील काही पदांच्या पदनामात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर केले. सदर प्रस्तावाप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठांमधील संदर्भाधीन क्र.१० ते १७ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयान्वये उक्त नमूद विद्यापीठांच्या काही पदनामांमध्ये बदल मान्य करण्यात आलेले आहेत. मात्र असे करताना बदललेल्या पदनामाच्या अनुषंगाने त्या पदांच्या वेतनश्रेणीमध्ये बदल झालेला आहे. सबब सदरहू शासन निर्णयानुसार मूळ

पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे पदनाम बदलून त्यांची त्याप्रमाणे बदल झालेल्या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करण्यात आली. पर्यायाने बदललेल्या पदनामामुळे मूळ पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या मध्ये बदल न होता केवळ त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये बदल झाला आहे. अशी कार्यवाही करताना विहित कार्यपध्दतीचा व वित्तीय नियमांचा अवलंब झालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पदनाम बदललेल्या व इतर विद्यापीठातील समान पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनसंरचनेत असमानता निर्माण झाली.

वरील बाबींचा विचार करून ज्या शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठातील विविध पदांच्या पदनामात बदल करताना ज्या पदांच्या वेतनश्रेण्यामध्ये बदल झाला ते शासन निर्णय रद्द करून त्या पदांच्या वेतनश्रेण्यात शासन अधिसूचना दि.०४ फेब्रुवारी, १९९९ व दि.०७ ऑक्टोबर, २००९ प्रमाणे पूर्ववत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

१. या शासन निर्णयान्वये शासन संदर्भाकिंत क्र.१० ते १७ येथील शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करीत आहे.

२. संदर्भाकिंत क्र.१० ते १७ येथील शासन निर्णयामधील ज्या पदांच्या पदनामात बदल करून वेतनश्रेणीत बदल झालेल्या पदांच्या प्रचलित वित्तीय नियमानुसार वेतनश्रेण्या पूर्ववत करणे, अतिप्रदान झालेल्या रकमेची परिगणना करणे, निवृत्ती वेतन पुन:निर्धारित करून प्रस्तुत प्रकरणात वित्तीय कार्यप्रणालीनुसार कार्यपध्दती विहित करणे इ. कार्यवाही करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील अधिकाऱ्यांचा समावेश असेलेले एक "विशेष पथक" संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिनस्त स्थापन करण्यात येत आहे. सदरहू पथकाची रचना खालीलप्रमाणे असेल,

| अ.क. | पदनाम | संख्या |
|---|---|---|
| १ | उपसंचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा | १ |
| २ | सहायक संचालक, लेखा | १ |
| ३ | लेखाधिकारी | ५ |
| ४ | सहायक लेखा अधिकारी | ५ |

वरील तक्त्यामधील अनु क्र.१ ते ४ मधील नमूद पदांवर उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या व यासंदर्भातील अभ्यासू व जाणकार/माहितीगार असलेल्या अधिकाऱ्यांची निवड संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ०८ दिवसांत करून त्याबाबतचे आदेश निर्गमित करावे.

३. सदरहू "विशेष पथकाने" आपला अहवाल स्वयंस्पष्ट शिफारशीसह एक महिन्यात संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, यांना सादर करावा.

४. सदरहू "विशेष पथकाचा" अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यामधील शिफारशीनुसार संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

i) ज्या कर्मचाऱ्यांच्या पदनामात बदल होऊन वेतनश्रेणीत बदल झालेला आहे, अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या दि.०७ ऑक्टोबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार मूळ पदावर आणून त्यानुसार त्यांची वेनतनिश्चिती करण्यात यावी.

ii) तसेच पदानाम बदलामुळे ज्या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीमध्ये बदल होऊन झालेल्या अतिप्रदानाची रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याकडनू वसूल करणे आवश्यक असून सदर वसूल करण्याची प्रक्रिया सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर देय थकबाकीच्या रकमेमधून करण्यात यावी.

iii) संदर्भाकिंत क्र.१० ते १७ येथील शासन निर्णयाचा लाभ मिळून जे कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत, अशा कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वेतन पुन:निर्धारित करण्यात यावे.

iv) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली करणे आवश्यक असून सदरहू रक्कम सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर देय थकबाकीतून समायोजित करण्यात यावी.

५. तसेच सर्व अकृषि विद्यापीठामधील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तके विभागीय लेखा अधिकारी (उच्च शिक्षण) यांनी तपासल्याशिवाय त्यांची निवृत्तीवेतन प्रकरणे महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येऊ नयेत.

६. वरील परिच्छेद क्र.२ ते ३ येथील कार्यवाही पूर्ण होऊन त्याप्रमाणे नियमानुसार वेतननिश्चिती होईपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांना संदर्भाधीन क्र.२ येथील दि.०७ ऑक्टोबर, २००९ च्या अधिसूचने अन्वये संबंधित पदांना अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करण्यात यावे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभाग, अ.नौ.स.३४८/२०१६/सेवा-९, दि.०५.१०.२०१६, क्र.०६/को.प्र.-२, दि.२०.०२.२०१८, क्र.२६/को.प्र.-२, दि.१६.०६.२०१८ अन्वये सूचित केल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्र.२०१८१२१७१५२२३९३२०८ आहे. हा आदेश डिजीटील स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2018.12.17 16:18:40 +05'30'

( सिध्दार्थ खरात )

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई-१, महाराष्ट्र, (५ प्रती),
५. महालेखापाल (लेखा परीक्षा) मुंबई-१, महाराष्ट्र, (५ प्रती),

६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर-२, महाराष्ट्र, (५ प्रती),
७. महालेखापाल (लेखा परीक्षा) नागपूर-२, महाराष्ट्र, (५ प्रती),
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
१०.कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१२.मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
१३.मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१४.सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५.वित्त विभाग,(व्यय-५/सेवा-९/कोषा. प्रशा-२) मंत्रालय,मुंबई,
१४. निवड नस्ती (विशि-१)